# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २०-२३** **दिनांक २०/०१/२०२३**

## डिसेंबर महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) दिनांक २६/१२/२०२२ रोजी वालीव पोलीस ठाणेस गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली कि, पहाटे ०२.३० वा. ते ०३.३० वा. चे सुमारास कामण, वसई पुर्व येथुन भिवंडी, ठाणे दिशेने वालीव पोलीस ठाणे हद्दीतुन एक कंटेनर ट्रक रक्तचंदन लाकडाची बेकायेदशीर वाहतुक करणार आहे. प्राप्त माहितीच्या अनुषंगाने कामण बिट चौकीचे रात्रपाळी कर्तव्यावर असलेले अधिकारी व अंमलदार यांनी सदरबाबत वरिष्ठांना माहिती देवनु त्यांच्या मार्गदर्शनाखील कायदेशीर बाबींची पुर्तता करुन नाकाबंदीचे आयोजन केले. पहाटे ०३.०० वाचे सुमारास सदरचा कंटेनर ट्रक येत असल्याचे निदर्शनास आल्याने वाहतुक कोंडी करुन सदरचा कंटेनर ट्रक व ट्रकचा चालक नामे गयाप्रसाद माहदेव चौधरी, वय ५९ वर्षे, रा. गणेश नगर वडाळा पुर्व मुंबई व क्लिनर नामे सुजित बापु साटम, वय ५२ वर्षे, बोरीवल, मुंबई पश्चिम यांना ताब्यात घेवुन पंचासमक्ष कंटेनर ट्रकचा मागील दरवाजा उघडला असता प्रथम दर्शनी कांदयाच्या गोण्या दिसुन आल्या व कांदयाच्या गोणीचे मागील बाजुस पांढ-या व खाकी रंगाच्या गोण्यामध्ये लालसर रंगाचे लाकडाचे ओंडके मिळुन आले. सदरबाबत चालक व क्लिनर यांस विचारपुस केल्याने सदर लाकडी ओंडके हे रक्तचंदनाचे असुन लाकडी ओंडक्यांची कागदपत्र नसल्याबाबत खात्री झाल्याने सदर आरोपीतास अटक करुन एकुण ०९,६१,६४,१८०/- किंमतीचा रक्तचंदन लाकडाचा मुद्देमल जप्त करण्यात आला होता. वर नमुद आरोपीताविरुध्द वालीव पोलीस ठाणेत गु.रजि.नं. १३६६/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४१३,३७९.३४ सह भारतीय वन अधिनियम १९२७ चे कालम ४१,४२ अन्वये दाखल करुन अटक करण्यात अली.

वालीव पोलीस ठाणे यांनी सदर गुन्हयाची गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळवुन सदरचा गुन्हातील आरोपीत यांना अटक करुन मुद्देमाल जप्त केल्याने श्री. कैलास बर्वे, पो.उप.निरि. चव्हाण, साबळे, पो.हवा. तारमाळे, महेश बोडके, पो.शि. काळे, सातपुते, बावधने, म.सु.ब. वयदंडे यांचा दिनांक २०/१/२०२२ रोजी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये

**'डिसेंबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल' क्रमांक-१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना वपोनि. श्री. कैलास बर्वे**

२) दिनांक २०/१२/२२ रोजी सायंकाळी ५.०० वा. पुर्वी वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दिमध्ये नायगाव ऑरनेट लिंक रोड, पुर्व ते स्टार सिटीकडे जाणा-या कच्चा रोडच्या डाव्याबाजुचे मोकळया जागेत मयत इसम सुनिल तिवारी, वय ३४ वर्ष, राह. जौनपुर राज्य-उत्तरप्रदेश यास कोणीतरी अज्ञात इसमाने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन मारहाण करुन पांढ-या रंगाच्या उपरण्याने गळा आवळुन जीवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने त्यास निर्जन स्थळी टाकुन दिल्याने वालिव पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं १३३८/२२ भा.द.वि.सं.कलम ३०२, २०१ प्रमाणे दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयात मयताची ओळख पटली होती परंतु तो मुकबधीर होता तसेच तो नुकताच गावाहून आला असल्याने त्यास कोणी मारले व का मारले याबाबत काहीएक उलगडा होत नव्हता तसेच त्याला नालासोपारा या ठिकाणी जाणे गरजेचे असताना तो नायगाव स्टेशन येथे का उतरला या प्रश्नाचे उत्तर देखील मिळत नव्हते. त्यामुळे अशा संवेदनशील गुन्हयाचा कसोशीने तपास करण्याचे आदेश श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) यांनी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा व युनिट २ वसई यांना दिले होते. गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने घटनास्थळी गुन्हे शाखेतील अधिकारी/अंमलदार यांनी भेट देवून घटनास्थळाची व परिसराची बारकाईने पाहणी करुन सतत तीन दिवस अहोरात्र मेहनत घेवुन तांत्रिक पुराव्यांचे विश्लेषण करुन आरोपीत यशवर्धन अशोक झा, वय २१ वर्षे, राठि. नायगांव (पुर्व), ता. जि. ठाणे यास त्याचे राहते घरातुन दिनांक २३/१२/२०२२ रोजी ताब्यात घेउन त्याच्याकडे गुन्हाच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यानेच मयत इसमास लुटण्याकरीता सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

सदर कामगिरी करणारे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा व युनिट २ वसई चे श्री. राहुल राख, श्री. शाहुराज रणवरे, स.पो.नि. दत्तात्रय सरक, नितीन बेंन्द्रे, सागर शिंदे, सुहास कांबळे, श्रेणी पो.उप. निरी. चंद्रकांत पोशिरकर, सपोउनि. रमेश भोसले, संजय नवले, संतोष चव्हाण, पो.हवा. मनोहर तावरे, प्रविणराज पवार, राजविर संधु, सतिष जगताप, अनिल नांगरे, आसिफ मुल्ला, राजाराम काळे, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, महेश वेल्हे, संग्राम गायकवाड, सुनिल कुडवे, जयकुमार राठोड, सचिन पाटील, दादासाहेब आडके, रमेश आलदर, प्रशांत ठाकुर, पो.अम. हनुमंत सुर्यवंशी यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **डिसेंबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट**

**उकल क्रमांक-** २ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पो.नि. श्री. राहुल राख**




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पो.नि. श्री. शाहुराज रणवरे**

३) दिनांक १६/११/१९९४ रोजी १५.४५ वा.ते २३.०० वा.चे दरम्यान आरोपीत अनिल सरोज, सुनिल सरोज, काल्या ऊर्फ राजकुमार यांनी पुर्ववैमनस्यातुन पुर्व तयारी करुन चॉपर व सुरी घेवून फिर्यादी राजनारायण शिवचरण प्रजापती रा. भारवाड चाळ, पेणकर पाडा, काशिमीरा यांचे घरात घुसुन त्यांची पत्नी, ३ मुले व १ मुलगी यांना गंभीर दुखापत करुन त्यांची निघृणपणे हत्या करुन पुरावा नष्ट करणेसाठी फिर्यादी यांची घराचे

दरवाजास बाहेरुन बंद करुन वापरलेली हत्यारे व अंगावरील रक्ताने माखलेले कपडे आरोपीत राहत असलेल्या घरात लपवून ठेवले होते. सदर घटनेबाबत काशिमिरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १०७/१९९४ भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१, ४५२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील आरोपी हे गुन्हा घडल्यापासून फरार झाले होते. नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपीतांचा अदयाप पावेतो ठावठिकाणा न लागल्याने सदर गुन्हा बराच कालावधी पर्यंत उघडकीस आला नव्हता. सदर गुन्हा गंभीर असून बराच कालावधी पर्यंत उघडकीस न आल्याने वरिष्ठांनी तो उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा, कक्ष १, काशिमिरा येथे नेमणुकीस असलेले अधिकारी व अंमलदार यांनी अरोपीत नामे काल्या ऊर्फ राजकुमार याचा पासपोर्ट नंबर मिळवुन त्याला गुन्हे शाखा, कक्ष १, काशिमीरा मार्फत ख्व्क वर ठेवून त्याच्या  हालचालीवंर पाळत ठेवण्यात आली होती.

दिनांक २९/१२/२०२२ रोजी आरोपीत नामे सावलाला ऊर्फ काल्या उर्फ साहेब उर्फ राजकुमार अमरनाथ चौहान, वय १९ वर्षे, रा. मु. कैराडी, पो. पचवनीया, ता. चकीया, जि. बनारस, राज्य उत्तर प्रदेश हा कतार येथुन विमानाने मुंबई इंटरनॅशनल एअर पोर्ट येथे आला होता. नमुद आरोपी हा ख्व्क वर असल्याने एअरपोर्ट ॲथॉरिटीने त्यास थांबवुन सदरची माहिती काशिमीरा पोलीस ठाणे येथे देवुन त्यास काशिमीरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले होते.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष ०१ चे पो.नि. अविराज कुराडे, स.पो.निरी कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, पो.उप.निरी. हितेंद्र विचारे, सफौ. राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, पो.हवा. संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, सचिन सावंत, समीर यादव, पो.अंम. प्रशांत विसपुते यांना मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **डिसेंबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -३** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पो.नि. श्री. अविराज कुऱ्हाडे**

४) दिनांक १०.१२.२०२२ रोजी काशिमिरा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील मुंशी कंपाउंड, काशिमिरा येथील मुंबई-अहमदाबाद हायवे लगत असलेल्या सेल पेट्रोल पंपाजवळील रोडवर फिर्यादी श्री. अजादार मोहम्मद नुर मोहम्मद खान, वय-१९ वर्षे, रा. शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई हे काम करित असताना एका अनोळखी इसमाने तक्रारदार यांना मोबाईल

दुकानाबाबत विचारुन बोलण्यात गुंतवुन त्यांचा मोबाईल स्वतः घेवुन त्याबदल्यात काच असलेला काळ्या कपडयाचा पाऊच त्यात तक्रारदार यांचा मोबाईल असल्याचे भासवुन दिला. तसेच त्यावेळी सदर ठिकाणी आरोपीताचा दुसरा साथीदार इसम काळया रंगाच्या शाईन मोटरसायकलवरुन येवुन ते दोघेही तक्रारदार यांचा मोबाईल फोन चोरुन जात असल्याचे तक्रारदार यांचे लक्षात आल्यानंतर तक्रारदार यांनी त्या दोघांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्या दोन्ही ईसमांनी तक्रारदार यांना हिसका दिल्याने तक्रारदार हे जमीनीवर पडल्याने त्यांचे डाव्या हाताला, पायाला, व डोक्याला खरचटुन जखम झाली होती. सदर घटनेबाबत काशिमीरा पोलीस ठाणेत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गु.रजि.नं ८६५/२०२२, भा.द.वि कलम ३९२,३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत चार अनोळखी ईसम हे मोटरसायकली वरुन येवुन त्यांचेकडे असलेला मोबाईल फोन नागररिकांना खरेदी करण्याचे अमिष दाखवुन किंवा सदर मोबाईलच्या बदल्यात नागरिकांकडे मोबाईल हस्तांतरीत करण्याचा बहाणा करुन त्यांच्याकडील मोबाईल फोन पाहाण्यासाठी घेतात व नागरिकांनी मोबाईल फोन खरेदी करण्यास नकार दिल्यास ते हातचालाखीने किंवा जबरदस्तीने मोबाईल फोन हिसकावुन घेत असल्याच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत होती. त्याअनुषंगाने नमूद घटनांना प्रतिबंध करण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी काशिमिरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदारांना सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या व तांत्रिक विश्लेषनाव्दारे आरोपीत १) सोनु नुरमोहंमद मलिक, वय २९ वर्षे, २) दानिश जाहीद मलिक, वय २७ वर्षे, ३) मोहमद साजीद अब्दुल कादीर राजपुत, वय २८ वर्षे तिन्ह मुळ रा. मेरठ, उत्तर प्रदेश, ४) सागर विनोद वर्मा, वय २० वर्षे, मुळ रा. शहादरा, नवी दिल्ली यांना कुर्ला, मुंबई (प) या ठिकाणाहुन ताब्यात घेवुन दिनांक ११/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आली होती तासादरम्यान मि.भा.व.वि. आयुक्तलाय, ठाणे शहर आयुक्तालय, मुंबई शहर आयुक्तालय येथील एकुण १७ गुन्हे उघडकीस आणुन एकूण ५,७४,०००/- रु. किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला.

सदरची कामगिरी करणारे श्री. संजय हजारे, तत्कालिन वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पो.नि. विजय पवार (गुन्हे), स.पो.निरी. श्री. प्रशांत गांगुर्डे, पोलीस उप निरीक्षक श्री. निखील चव्हाण, श्रेणी पो.उप निरीक्षक श्री. प्रकाश कावरे, पो.हवा. सचिन हुले, हणुमंत तेरवे, परेश पाटील, निलेश शिंदे, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, पो.अंम. रविंद्र कांबळे यांना दिनांक २०/१/२०२२ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांनी **'डिसेंबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणून स्पेशल रिवॉर्ड'** देवून सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना व.पो.नि. श्री. संजय हजारे**

५) दिनांक ०३/१२/२०२२ रोजी १४.३० वाजता ते दिनांक ०५/१२/२०२२ रोजी सकाळी ०९.४५ वा. चे दरम्यान फिर्यादी नामे श्री. देवेंद्र खेमराज जैन, वय ४८ वर्षे, विरार पुर्व, ता.वसई, जि. पालघर यांनी त्यांची टोयोटा कंपनीची इनोव्हा कार क्रमांक एम.एच.४८.एस. ०८७९ ही श्रमसाफल्य बिल्डींग, विर सावरकर रोड, भोलानाथ फर्निचर समोर, विरार पुर्व येथे पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांच्या गाडीच्या डाव्या बाजुकडील दरवाज्याची काच तोडुन, नुकसान करुन कारमधील टोयोटो कंपनीचा कारटेप चोरी केल्याबाबत फिर्यादी यांनी विरार पोलीस ठाणेत फिर्याद दिल्याने विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नं.११४४/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७९, ४२७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील परिसरात गेल्या काही महिन्यांपासुन महागडया कारचे काच फोडुन म्युझिक सिस्टीम / कार टेप चोरीच्या गुन्हयाच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होवून सदर गुन्हे करणारी टोळी अधिक सक्रीय झाली होती. सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन गुन्हयांना आळा घालण्यासाठी तसेच दाखल गुन्हयांचा तपास करुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, कक्ष ३ कडे वर्ग करण्यात आला होता. सदर गुन्हयात तांत्रिक विश्लेषण व मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपीत नामे १) जुबेर रईस अहमद, वय ३२ वर्षे, २) शहनवाज मोहम्मंद अलियार खान, वय १९ वर्षे, दोन्ही रा- तळोजा, नवी मुंबई यांना दिनांक ०९/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आली. व आरोपीत नामे ३) परवेज इकबाल सैय्यद, वय ३६ वर्षे, रा. कुर्ला कपाडीया नगर, सी.एस.टी. रोड, कुर्ला (पश्चिम) मुंबई ७० यास दिनांक १२/१२/२०२२ रोजी अटक करण्यात आली. नमूद आरोपीतांकडून गुन्हा करण्याकरीता वापरण्यात आलेली एक आय १० कार, एक स्विफ्ट कार व चोरी केले २० म्युझिक सस्टीम (कारटेप) असा एकूण १०,३२,१६०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय तसेच ठाणे शहर आयुक्तालयातील १५ गुन्हे उघडकीस आणण्यात आले होते.

सदरची कामगिरी करणा-या गुन्हे शाखा कक्ष ३ चे पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, सागर बारवकर, सचिन घेरे, शंकर शिंदे, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविन वानखेडे यानां दिनांक २०/०१/२०२२ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांनी **‘डिसेंबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणून स्पेशल रिवॉर्ड क्र-२’** देवून सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पो.नि. श्री. प्रमोद बडाख**

--------------------oooo------------------------